# 2000 वर्षांपूर्वीचे नाशिक

म. ग्रं. सं. ठाणे
विषय — प्रवास
नं. १०७

REFBK-0019105



लेखक :— भि. रा. देवभानकर बी. ए.

[ किंमत सहा आणे ]

# २००० वर्षांपूर्वीचें नाशिक

लेखकः—भि. रा. देवभानकर बी. ए.

REFBK-0019105

किंमत सहा आणे

: मुद्रक व प्रकाशक :
रमाकान्त वेलदे
सुदर्शन प्रेस, नासिक.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

१९४९

डिझाईन व ब्लॉक— "प्रतिभा"
१०८० चांदवडकर लेन
नासिक.

९८.२०.३
२७.३.१
१९५०
२०३१५

# देवभानकर यांच्या लघुकथा—
## —संग्रहावरील कांहीं अभिप्राय

**प्रकाशकिरणें:**—शंभर पृष्ठांच्या या पुस्तकांत सुमारें पंचवीस समाज-चित्रें रंगविलीं आहेत. तीं अशा कौशल्यानें कीं, तीं वाचतांना हंसू येणार नाहीं, आणि वाचल्यावर हळहळ वाटणार नाहीं असा वाचक विरळाच सापडावा.

—केसरी

गोष्टींत उपरोध, उपहास यांच्या ज्या छटा दाखविल्या आहेत त्या वरून लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तिचा प्रत्यय येतो. बावीस छोट्या गोष्टींचा हा संग्रह म्हणजे समाजाच्या डोळयांत झणझणित अंजन आहे.

—चित्रमयजगत्

**वोचकारे आणि सुरकारे :**— हें पुस्तक विविध समाज-चित्रांनीं वाचकांच्या डोळयांत अंजन घालील असें आहे.

—नवाकाळ

दुष्ट सामाजिक रुढी आणि मानवी जीवन व स्वभाव यांतील दोष यांचें विडंबन श्री. देवभानकर यांनीं कौशल्यानें केलें आहे. उपरोध आणि उपहास यांचा उपयोग करून लेखकानें सामाजिक अन्यायांवर सणसणीत फटकारे लगावले आहेत.

—लोकमान्य

या उपहास कथा वाचकांना नवा विचार आणि नवी दृष्टि दिल्यावाचून राहणार नाहींत.

—चित्रमयजगत्

**न दिसणारे कांटे:—** ढोंगाचा पडदा दूर करून सामाजिक व्यंगांचें लेखकानें मर्मभेदक भाषेंत वाचकांना दर्शन घडविलें आहे.

**—लोकमान्य**

प्रत्येक गोष्टीचा विषय हा जिव्हाळयाचा आहेच पण एकंदरीत कथालेखनाची शैलीच चटकदार आहे. **—केसरी**

समाजांतला ढोंगीपणा, लोकसेवेच्या नांवाखाली दडलेला स्वार्थ, दांभिक दयाबुद्धि, वगैरे गोष्टी प्रस्तुत लेखकानें मोठ्या कुशलतेनें चव्हाट्यावर आणल्या आहेत. **—चित्रमयजगत्**

**भावनेचें अंकुश—** प्रत्येक गोष्टींत एकाच विशिष्ट भावनेचा इतका जोरदार आविष्कार केलेला दृष्टिस पडतो कीं, प्रस्तावना-लेखक य. गो. जोशी यांनीं म्हटल्या प्रमाणें या गोष्टी हृदयाला जावून भिडतात. लेखकाची कथनशैलीही भावनापूर्ण व हृद्य आहे.

**—चित्रमयजगत्**

या कथा हृदयस्पर्शी व चटकदार आहेत.

**—विविधवृत्त**

एकमेव विक्रेते:-**मेसर्स जोशी ब्रदर्स**

बुकसेलर्स अँड जनरल मर्चंटस्, रविवार पेठ, आग्रारोड

नाशिक सिटी

# अगदीं पूर्वींचं नाशिक

नाशिकचा सांस्कृतिक इतिहास लिहिण्याचा हा प्रयत्न नाहीं. इतिहासाचें सखोल ज्ञान मला नाहीं. ज्या कांहीं किरकोळ गोष्टी अनायासे माझ्या पाहण्यांत आल्या. जीं एक दोन हाताशीं आलेलीं पुस्तक वर वर वाचण्यांत आलीं, त्यांचा जो माझ्या मनावर परिणाम झाला; त्याची अगदी त्रोटक माहिती मी आपल्यामुढें सादर करीत आहे. एखादा ऐतिहासिक वादग्रस्त प्रश्न धसाला लावून कांहीं नवीन प्रकाश पाडण्याची माझ्यांत कुवत नाहीं.

मला नाशिक कसं दिसलं हें मी सांगणार आहे. मी माझ्या चष्म्यांतून पाहिलेलं हे नाशिक आहे. हें एक नाशिकचं ट्रेलर आहे. फिल्म मधून मला जो भाग चांगला वाटला तो तोडून कांहीं मागचे कांहीं पुढचे असे तुकडे एकत्र करून केवळ कुतुहल जागृत करण्याच्या उद्देशानें मी आपल्याला हे दाखवीत आहे. सुसंबद्ध इतिहास यांत नाहीं सांपडणार! एखादा चांगला देखावा, एखादी गाण्याची लकेर, संवादांतील मधलीच दोन चार वाक्यं, असं हें नाशिकचं ट्रेलर बनवलेलं आहे.

पूर्वजांच्या जुन्या आठवणी अभिमान म्हणून पुढें पुढें करण्यानं आपली नालायकी सिद्ध होते हें मी जाणून आहे. पण जुन्या काळच्या आठवणी–आठवणी कसल्या त्या? कल्पनाच म्हणाना? किंवा कल्पनेच्या आठवणी म्हणा पाहिजे तर!! कारण आपण काय पाहिलं आहे पूर्वीचं! पूर्वीची कोणची माहिती आहे आपल्याला! घडी घडी कल्पना डोक्यांत आल्या कांहींतरी कल्पनाचं वातावरण उत्पन्न झालं. मनांत काहूर माजलं. जुनी संस्कृति जुनी संस्कृति म्हणतात ती आहे तरी काय! आपल्या कल्पना कितपत खऱ्या आहेत! ही खात्री करून घेण्याकरितां थोडं इकडे तिकडे पाहिलं आणि जें दिसलं, जें पाहिलं तें आपल्यापुढें ठेवलं आहे.

•

प्रत्येकानें स्वतःची कर्तबगारी जगाला दाखवावी हेंच खरं. पूर्वीचं वैभव गेलं म्हणून हुंदके देत हेल काढून आजीबाईसारखं स्वयंपाक घरांत बसून रडण्यांत अर्थ नाहीं. हें जितकं खरं, तितकंच ज्या बागलाणच्या राठोड नांवाच्या राजपूत घराण्यानं इ. स. ३०० पासून १६४० पर्यंत तेराशे वर्षें बागलाणमध्यें राज्य केलं त्याच वंशातले राजपूत जर सिनेमा थिएटर जवळ पानपट्टीचं दुकान काढून बसलेले दिसले तर त्यांना थोडी जुनी आठवण करून देणं हें आपलं कर्तव्य नाहीं काय? ते आठवण विसरले असतील पण म्हणून त्यांना आठवण देऊं नये? पानपट्टीच्या दुकानावर बसलेला "हा कोण" हें ज्याला माहीत आहे, त्याचें कर्तव्य आहे त्याला आठवण करून द्यायचं! प्रथम बागलाणचं एक लहानस ट्रेलर दाखवतो.

इ. स. १५९९ सालीं बागलाणच्या राठोड राजाजवळ ४००० घोडेस्वार आणि १०० हत्ती होते. इतिहासकार म्हणतो.

"The chief of Baglan (Pratapshah) was said to have always in readiness 4000 mares of an excellant breed and one hundred elephants".

ऐने अकबरीमध्यें बागलाणचं खालील प्रमाणें वर्णन आहे.

"Baglan is described in Ain-i-Akabari (1590 A.D.) as a mountanious well peopled conutry between Surat and Nandurbar. The Chief was of Rathod tribe and commanded 8000 cavalry and 5000 infantry. Apricots, apples, grapes, pine-apples, pomegranates and citrons grew in perfection. It had seven forts, two of which Mulher and Saler were places of *unusual strength*".

हें अडीचशे वर्षांपूर्वीचं बागलाणचं वर्णन आहे. त्यावेळीं हा एक चांगला गजबजलेला भाग होता. राठोड राजाजवळ कितीतरी घोडदळ आणि पायदळ होतं. जीं फळं आज नाशिक जिल्ह्यांत पहायलासुद्धां मिळत नाहींत त्या सर्व फळफळावळीन सुसंपन्न असा हा देश होता.

मी त्या पानपट्टीवाल्याला विचारीन कीं हें असं सुंदर बागलाण सोडून तूं हें नाशिकला पानपट्टीचं दुकान कां काढलं? त्याच

राजपूत जातींत जन्म घेऊन आज हें पानपट्टीचं दुकान कां काढावं लागलं, जुन्या आठवणी देऊन मला त्याच्या जखमेवर मीठ चोळायचं नाहीं. आतां रडण्यांत किंवा रडवण्यांत काय अर्थ आहे हेंही खरं आहे. पण रडण्यांत देखील आनंद आहे. रडण्यांत हसण्यापेक्षां जरा जास्त उदात्त असा आनंद आहे. आपण "एकच प्याला" पुन्हां पुन्हां कां पाहतों? तत्वाकरतां हाल अपेष्टा सोसण्यांत जो आनंद आहे तो उपभोगल्याशिवाय समजणार नाहीं. त्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणून बागलाण मधलीच एक करूण कहाणी सांगतो.

ज्या घराण्यानं १३०० वर्षं राज्य केलं त्या घराण्यांतल्या एका राजाचा हा इतिहास आहे. इ. स. १२९७ सालीं रायकरण नांवाचा राजा बागलाणमध्यें राज्य करीत होता. अल्लाउद्दीन यानें रायकरणचा पराभव करून त्याची पत्नी कौलादेवी हिला गुलाम म्हणून दिल्लीला नेले. इ. स. १३०६ सालीं अल्लाउद्दीन याचा सेनापती मलीक काफर याचा मुक्काम दक्षिणेंत असतांना त्याला कौलादेवीकडून दिल्लीहून निरोप आला कीं "माझी मुलगी देवलदेवी ही बागलाणचा राजा रायकरण याचे जवळ आहे. तिच्या शिवाय दिल्लीला मला करमत नाहीं. तरी कसेंही करून तिला दिल्लीला घेऊन या." लागलीच मलीक काफरनें रायकरण याला हुकूम सोडला कीं "देवलदेवीला ताबडतोब आमच्या स्वाधीन करा." रायकरण यानें ती विनंती अमान्य केली आणि लढाईला तयार झाला. तेव्हां रायकरणची मुलगी तेरा वर्षांची होती. रायकरणनें ताबडतोब

आपल्या मुलीचें लग्न देवगिरी [ दौलताबाद ] चे राजे रामराव यांचा मुलगा शंकरदेव याचेशीं निश्चित केलें, परंतु गुजराथचा सेनापति उलुघखान यानें बागलाणवर स्वारी केली. दोन महिने रायकरणनें घनघोर युद्ध केलें परंतु शेवटीं त्याचा पराभव झाला. देवलदेवीला मलीक काफर घेऊन जात असतांना दौलताबाद जवळ त्याच्या फौजेपैकीं ३०० सैनिक वेरूळची लेणीं पाहण्या करतां गेले. आशा वेडी असते! प्रयत्नवादी रायकरणनें पुन्हां उसळी मारली. फौज कमी आहे ही संधी साधून रायकरण घोडेस्वार घेऊन पुन्हां लढाईला सिद्ध झाला. पण त्यांतही त्याचा पराभव झाला.

पुढे देवलदेवीचेही हाल हाल झाले. इ. स. १३१६ सालीं तिच्या नवऱ्याचे डोळे फोडून मलीक काफरनें त्याला ठार केले. मलीक काफरलाही पुढें कामावरून काढून टाकण्यांत आले. त्यानंतर मुबारख खिलजीच्या जनानखान्यांत देवलदेवीला सामील करण्यांत आले. मुबारख खिलजी हा तिचा दीरच होता. पुढें त्याचाही मलीक खुशरु यानें खून केला.

इकडे हत्ती, घोडे, राजवाडे वगैरे सर्व ऐश्वर्य सोडून- देश सोडून रायकरण निघून गेला. कित्येक वर्षे बागलाणमध्यें राज्यकरणारा रायकरण निर्वासित म्हणून भटकत राहिला. त्यानें वेष पालटला. नांव बदललें. आणि कुठें निघून गेला हे शेवट पर्यंत कळलं नाहीं. त्या पुढची माहिती उपलब्ध नाहीं. इतिहाकार म्हणतो.

"History records no more of the unfortunate Karan. He died probably a nameless fugitive."

मुलीच्या रक्षणाकरितां सर्वस्वाचा होम करणारा राजा आमच्या बागलाणचा होता. रायकरणचा पराभव झाला त्यांत त्याचा कमीपणा नाहीं. त्यानें लढाई दिली! होतं नव्हतं तेवढं सर्व बळ खर्च केलं. आपलं लहानसं राज्य एवढ्या मोठ्या सैन्याशी टक्कर देऊं शकणार नाहीं हें माहीत असतांना लढला! सर्व राज्य बेचिराख झालं तरी लढला! त्यानें सर्वस्व पणाला लावलं! राज्य हरला. भणंग भिकारी म्हणून देशोधडीला लागला. याला चारित्र्य म्हणतात! असो. बागलाणचा राजा रायकरण याची करूण कहाणी संपली. त्याचं बेवारशी प्रेत सद्गति न मिळतां कुठेतरी पडलं असेल. पण स्वर्गांतल्या रायकरणच्या आत्म्याला मी नाशिककरांतर्फें ग्वाही देतो कीं तुझं उदात्त चारित्र्य पाहून आम्ही दोन अश्रू ढाळलेले आहेत. वाचकहो! जरा जागे व्हा. हा सिनेमा नाहीं. सिनेमाकरितां लिहीलेलें हें कपोल-कल्पित कथानक नाहीं. हा इतिहास आहे.

वैभव गेल्याचं दुःख एकवेळ आपल्याला झालं नसतं. जर दोन हजार वर्षांपूर्वी वैभव भोगणारा आणि आज हाल भोगणारा नाशिककर यांत कांहींच बदल नसता तर आजही त्याच्या हाल आपेष्टेला उदात्त स्वरूप आलं असतं. सिंहासनावर बसलेल्या श्रीरामचंद्रापेक्षां वनवासी राम चांगला दिसतो. परंतु त्यावेळच्या नाशिकरांची संस्कृति आणि आजची त्यांची संस्कृति यांत जमीन अस्मानाचं अंतर पडलं आहे.

नाशिकची संस्कृति अत्यंत पुरातन आहे. पुणें, मुंबई त्याबाबतींत नाशिकची बरोबरी करूं शकणार नाहीं. रामायण ही कादंबरी आहे असं म्हणणारे कांहीं लोक आहेत. एकें काळचं पद्मनगर, त्यानंतरच त्रिकंटक आणि त्यानंतरच जनस्थान यांचा आज प्रत्यक्ष दाखविता येईल असा पुरावा नसला तरी अडीच हजार वर्षांपूर्वीचं नाशिक कसं होतं याचा सबळ पुरावा आजही आपणाला पहायला मिळतो. आजही पांडवलेण्यांतील शिलालेख नाशिकची अडीच हजार वर्षांपूर्वीची संस्कृति दाखवूं शकतात. पुराण आणि आख्यायिका यावर विश्वास ठेवण्याची जरुरी नाहीं. इसवीसनापूर्वी २०० या सुमाराला बांधलेला भारहूत नांवाचा एक फार जुना बुद्धाच्यावेळचा स्तूप आहे. तो जबलपूरपासून शंभर मैलावर आहे. त्यांत एका खांबावर एक शिलालेख आहे आणि त्यांत "नाशिक येथील वसूक याची पत्नी गोरक्षित हिनें देणगी दाखल बांधला" असा उल्लेख आहे. पांडवलेण्यामधील वीस नंबरच्या लेण्यांतील शिलालेखांत नाशिकचा स्पष्ट उल्लेख आहे.

"नासिककानां धांभिक ग्रामस्य दानं"

"Gift of the village Dhambika by the inhabitants of Nasik.

हें लेणें इ. स. पूर्वी ५० या सुमाराला खोदलें गेलें आहे. त्यानंतर बावीस नंबरच्या लेण्यांत खालीलप्रमाणें शिलालेख आहे.

" शालिवाहन कुले कृष्णे राजनि नासिककेन.

श्रमणेन महामात्येन लयनं कारितं "

" When krishna of shaliwahan family was king this cave was made by the great shrmana minister an inhabitant of Nasik "

हेंही लेणें इ. सनापूर्वी ५० वर्षं या कालांत तयार झालेलें आहे. म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी खोदलेलं आहे. येथें इ.सनापूर्वी दोनशें वर्षे व त्यानंतर दोनशें वर्षे अशीं चारशें वर्षं आध्रभृत्यांनी राज्य केलेलें आहे. ते बुद्धधर्मीय राजे होते. नाशिकच्या इतिहासांत तो काल अत्यंत भाग्याचा होता. गंगापूर जवळच गोवर्धन हे त्यांच राजधानीच शहर होतं. पांडवलेण्यामधील तीन नंबरचें लेणें हें इ. सनापूर्वी ५ ते १७ या वर्षामध्यें तयार झालें. ते त्यावेळचे नाशिकचे राजे शातकर्णी गौतमीपुत्र यांची मातुश्री यांनीं खोदायला लावले. या लेण्यांतील शिलालेखांत राजमाता गौतमी हिचें वर्णन आहे. त्या शिलालेखाचें इंग्रजी भाषांतर असें आहे.

" Meritorious gift by the queen Gautami a lover of truth charity forbearance and respect for life, eagerly engaged in penance, self-control mortification and fasts, fully bearing out the title " wife of Royal sage " mother of the illustrous Satakarni ·Gautamiputra ( son of Gautami ) king of kings——whose army have

drunk the water of three oceans, whose hand is fearless and wet by the water held in granting freedom for fear, who is a companion of all the townsman (his subjects) equal in happiness and in misery, who makes use of (nothing but) the taxes levied according to justice. Who never desires to kill an enemy though at fault, who has increased the prosperity of families of Brahmins and others. At whose feet the royal circles have bowed. who has stopped the fusion of the four castes, who has conquered multitudes of enemies in numerous battles, whose capital is unassailable to enemies, the depositary of shastras, the asylum of good men, the abode of wealth, the fountain of good manners, the only controller the only archer, the only hero the only holy man. equal in valour to Rama, Arjun Bhim sena."

राजमाता गौतमी कशी होती ! तिला सत्य आवडत असे? दानधर्मांतच तिला सुख वाटत असे. सहिष्णुता हा तिचा स्वभाव होता. प्रत्येकाच्या जीवनाकडे ती आदरानें पहात होती. तपश्चर्येंत ती सदा मग्न असे. तिचा मनावरचा ताबा वाखाणण्यासारखा होता. शरीर आणि आत्मा शुद्ध ठेवण्याकरितां ती उपवास करीत असे. यापेक्षां आदर्श राजमाता आणखी कोण असूं शकेल ! राजाला तपस्वी म्हटलेले आहे ! यावरून राजा हा त्यावेळीं भोग भोगणारा नव्हता. तो साधू होता. तपस्वी होता. गौतमीपुत्राचं वर्णन तर फारच बहारीचं आहे.

"गौतमी पुत्राची सेना तीन समुद्रांचं पाणी प्याली होती. म्हणजे एवढा मोठा प्रदेश त्यानें काबीज केला होता. त्याच्या हातांना भीति माहीत नव्हती. सगळ्यांना अभय देण्यांत त्याचा हात ओला झाला होता. सुखदु:खाचे वेळीं तो प्रजेचा मित्र म्हणून समभागी होता. न्यायानें जेवढा कर वसूल करता येईल तेवढाच कर तो वसूल करीत असे. शत्रूनेंही अपराध केला तरी त्याला ठार मारीत नसे. ब्राह्मण व इतर समाजांची त्यानें उन्नति केली. मोठमोठ्या राजांना त्यानें आपल्या पायाशीं लोटांगणं घालायला लावलीं. चारीं जातींत होणारा संकर त्यानें थांबविला होता. त्याच्या राजधानीकडे वाकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची छाती नव्हती. सर्व शास्त्रांचा तो संग्राहक होता. गुणी माणसें तो आपल्या पदरी बाळगीत असे. अत्यंत संपत्तिमान, उत्कृष्ट शास्ता, प्रवीण तिरंदाज, परम पवित्र असा तो होता. त्याच्या निशाणाला पराजय माहीत नव्हता. तो श्रीराम, अर्जुन आणि भीम यांच्या सारखा शूर होता."

हें वर्णन नाशिक येथें ज्या आंध्रभृत्य घराण्यानें चारशें वर्षे राज्य केलें त्यापैकीं एका राजाचं आहे. दीडशें वर्षे ज्या ब्रिटीशांनीं राज्य केलें त्यापैकीं एखाद्या व्हाईसरॉयचं नाहीं. हा नाशिकचा आदर्श राजा होता. He was above of wealth याचा अर्थ त्याचं बजेट कधीहीं तुटीचं नव्हतं. राष्ट्र प्रबल ठेवावं लागतं हें त्याला माहीत होतं. राज्यसंस्थेनें प्रजेच्या सुखदु:खांत सहभागी व्हायला पाहिजे, हे दोन हजार वर्षांपूर्वीं गौतमीपुत्राला माहीत होतं. गुणी माणसं पदरी ठेवावी लागतात हेंही त्याला माहिती होतं.

९८२ ...

वरील शिलालेख वाचून आपली खात्री झाली असेल कीं गौतमीपुत्राला जें माहीत होतं त्यापैकीं पुष्कळच गोष्टी आपल्याला अजून शिकायच्या आहेत! शत्रूनें देखील अपराध केला तरी त्याला तो ठार मारीत नसे! किती उदात्त विचार! लोकसत्ताक आणि प्रजासत्ताक वगैरे जे आपले विचार आहेत ना, ते थोडे आडोशाला घ्या. कारण मला कळतं कीं, आज आपल्याला राजाचा द्वेष करायचा असं शिकवलेलं आहे आणि तें खरंही असेल. इंग्लंडमध्यें नर्तकीला बरोबर घेऊन हिंडणारे जे नुसते आडनांवाचे राजे होते त्यांच्याबद्दल मलाही द्वेष आहे. पण राजा म्हणजे कोण? जो राज्यसूत्र चालवतो तो! एकच सवाल मी आपल्याला विचारतो कीं, ज्या अशोकाचं चक्र आपण आपल्या निशाणावर लावलं आहे तो सम्राट अशोक आजही दिल्लीला आपल्या कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली समोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला कीं "उद्यापासून हिंदुस्थानच्या साम्राज्याचीं सूत्रें पूर्ववत् मी माझ्या हातीं घेणार!" तर काय ठराव होईल असं वाटत आपल्याला?

× × ×

दहा नंबरच्या लेण्यांत राजा उषावदत्त याचा शिलालेख आहे. त्यानं लिहिलं आहे कीं उषावदत्त यानें तीनलाख गाईचं दान केलं. लाखो ब्राह्मणांना जेवूं घातलं. गोवर्धन येथें एक मोठी धर्मशाळा बांधली. तापीनदी ओलांडण्याकरतां फुकट नावा ठेवल्या. तो शिलालेख दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे. त्याचं इंग्रजींत भाषांतर असं आहे.

" The dwelling cave was constructed in Trirashmi hill in Gowardhan District by the Charitable Ushawadatta the son-in-law of Nahapna -- who ( Ushawadatta ) is the doner of three hundred thousand cows who has fed hundreds of thousands of Brahmins every year, who has furnished rest honses with four varandas at Gowardhan and provided gardens and wells, who has made River Tapti fordable by means of boats free of charges. "

तीन लाख गाईचं दान आज करायचं मनांत आणलं तर इतक्या गाईतरी मिळतील काय ? हल्लीचें कॅडल ब्रीडींग सेंटर्स फार झालं तर प्रत्येकी शे दोनशे गाई बाळगतात. अर्थात त्यानं ऑफिसर्स धरायचे नाहींत ! फक्त गाईच ! या शिलालेखावरून दोन हजार वर्षांपासून ब्राह्मणांचा भोजनाशीं निकटचा संबंध सिद्ध होत आहे ! हजारो ब्राह्मण त्यावेळींही अन्नावारीच होते कीं काय कोण जाणे ! चार वरांडे असलेली गोवर्धनची धर्मशाळा मात्र आज अस्तित्वांत नाहीं ! कोणत्या जागीं बांधलेली होती हेंहि सांगतां येत नाहीं. त्यावेळचा बगीचाही नाहीं. आणि त्यांतलीं फुलही नाहींत.

त्याच लेण्यांत अभीर राजा ईश्वर सेन यानें दिलेल्या देणगीचा उल्लेख आहे. त्यानें या त्रिरश्मी पर्वतांतील लेण्यामध्यें जे बुद्ध भिक्षू अध्ययन करण्याकरतां येतील ते जर आजारी पडले तर त्यांच्या औषधाकरतां रोख रक्कम देऊन ठेवलेली आहे. लेखाचें भाषांतर असें आहे.

King of Abhirs Ishwarsena gave a permanant capital for tha welfare and happiness of all beings, for medicine for the sick among the assemblage of mendicants from the four quarters living in the Trirashmi mouutain monastry.

बघा, त्यागांत किती अहमहमिका होती ती! औषधाकरता ही सोय केली होती.

त्याकाळीं गाईचं दान करणं आणि ब्राह्मण भोजन देणं हें मोठ्यांतलं मोठं दान समजलं जात असावं. चौदा नंबरच्या लेण्यांतही आसाच उल्लेख आहे.

The venerable Brahmins dine hundred thousands.

Donar of a hundred thousand cows to venerable Brahmins.

× × ×

मी नुकताच पांडवलेणी पाहून घरीं आलो होतो. काका घरींच होते. ते म्हणत असत कीं काय पहायचं त्यांत. जा तुम्ही पाहून या. मी पाहून आल्यानंतर कांकांना हकिकत सांगू लागलो.

'बर कां काका, पुल्लुमवी हा गोवर्धनला आलाच असला पाहिजे. कारण हें त्याचं राजधानीचं ठिकाण होतं. तो राज्यावर आल्यानंतर १८ व्या वर्षी त्याचा मुक्काम गोवर्धनला आला होता असा स्पष्ट उल्लेख शिलालेखांत आहे. इतिहासकार म्हणतात.

'The Benahata Cantonment where Pulumavi was camped in the eighteenth year of his reign is said to be of Gowardhan which seems to show that the cantonment was near Gowardhan, that he makes a grant in inscriplin No. 4 near (that is in the presence of) Shiva Skandila the minister of Gowardhan supports the view that Banahata Cautonment was near Gowardhan".

त्याचप्रमाणें तीन नंबरच्या लेण्यांतील शिलालेखांत स्पष्ट लिहिलं आहे कीं—

"The document has been commanded by the minister Shiva Gupta, touched by the great lord"

ज्या अर्थी त्यानें या शिलालेखाला हात लावला आहे त्या अर्थी गौतमीपुत्रही येथें या तीन नंबरच्या लेण्यांत येऊन गेला हें खास! आज या लेण्यांत मी ज्या ठिकाणीं उभा होतो त्याठिकाणीं दोन हजार वर्षापूर्वी हे मोठमोठे आंध्रराजे उभे होते काय त्यावेळीं त्यांचं ऐश्वर्य असेल! काय वैभव असेल!"

मी काकांना हकिकत सांगत असतांना बाळ्या–आमचा चुलत भाऊ गिरणींतून पिठाचा डबा घेऊन आला. थोड्यावेळानें आमच्या काकी बाहेर आल्या.

"पाहिलं कां, पायली मागें अर्धाशेर पीठ कमी आलं!" काकी म्हणाल्या.

काय अर्धाशेर कमी ! म्हणजे असं कसं झालं?" काका रागानें म्हणाले.

"बर का काका नंबर चारच्या लेण्यांत" मी हकीगत सुरु केली.

"सुरुंग लावून उध्वस्त करून टाक तीं लेणीं! करायचं काय आपल्याला त्यांच्याशीं" काका एकदम उसळून म्हणाले. "कोण तो पुलुमवी, आणि कोण तो गौतमीपुत्र! रेशनचं धान्य चार दिवस पुरत नाहीं. पाहुणें घर सोडत नाहींत! आणि त्यांत पुन्हां हे गिरणीवाले पायलीच्या मागे अर्धाशेर पीठ कमी द्यायला लागले म्हणजे कसं धकायचं!" काका बोलतच होते.

"कारे बाळ्या! चांगला इंग्रजी सहावींत शिकतो. आणि एवढंही पाहता नाहीं आलं तुला!" काकांनी बाळ्याला प्रश्न केला. पांडवलेण्याचं उदात्त वातावरण केवळ नाहींसं झालं होत.

"काका, दोन तास क्यू मध्यें उभा राहिलों तेव्हां नंबर आला. डबा ओतला तेव्हांपासून ओरडत होतो. बारीक बारीक जरा बारीक! पण पाहतो आहे कुठे तो माझ्याकडे! त्या काचेतून थोडं धान्य दिसत होतं तेव्हांच पुढच्या नंबरचा डबा ओतला त्यांनीं आंत! लागलीच मागच्यानें मला धक्का मारला आणि तों ओरडायला लागला बारीक बारीक! आपला डबा लाथेनें गिरणीवाल्यानें दूर सारला.

" उठाव " म्हणून जोरानं ओरडला. काय बोलायचं आणि ऐकतो आहे कोण!" बाळ्यानें उत्तर दिलें.

ऐक? काय तुझा गौतमीपुत्र भरून देणार आहे हें अर्धाशेर पीठ! कांहींतरीच डोक्यांत आणतो हा! याला वाटत कीं दोन हजार वर्षांपूर्वींचं नाशिकचं वैभव ऐकून आम्ही टाळ्या वाजवाव्या! वहावा वहावा म्हणावं! अरे पोट भरणार आहे का त्यांनीं? शिळो-प्याच्या गप्पा मारण्याचं काम चांगलं शिकलीं आहेत हल्लींचीं मुलं! म्हणे संकृति! आजचा दिवस गेला उद्याची भ्रांत अशी परिस्थिति सतत चालू आहे! एक दिवस आयुष्याचा सुखांत जात असेल तर शपथ! सगळ्या व्याधि उपाधि चालूंच आहेत. सगळी जिवंत राहण्या-करतां धडपड आहे. वेळ कुठे आहे! स्वास्थ कुठे आहे संस्कृतीचा विचार करायला. बाळ्या, अरे बाळ्या, तो डबा आण तर माझ्या समोर! माझ्या समोर मोजा एकदा. "पाहूं दे बरं!" काका म्हणाले.

मी विचार करूं लागलों. आमच्या काकांना कशांतच गोडी वाटत नव्हती. संसाराचा हा गाडा कसा चालवायचा हीच विवंचना त्यांच्यापुढें होती. त्यांना हासायलाही वेळ नव्हता आणि रडायलाही नव्हता. सगळ्या बाजूंनीं गळ्याला तात लागली असतांना आपण आणि आपली बायका मुलं जिवंत ठेवण्याची काकांची धडपड होती. त्यांना वाटत होतं कीं सर्व जग आपल्याला ठार मारायला उठलं आहे. सुबत्तेच्या काळचीं वर्णनं आज काकांचं पोट भरूं शकत नव्हती. मला माझ्या काकांना एवढंच सांगावस वाटतं कीं, ही मला पुढच्या

काळाचीं स्वप्नं पडताहेत ! आतां आपल्याला कुठें जायचं आहे हें मी मागच्यांना विचारतो आहे. मी आज स्वप्न सृष्टींत आहे. मोठमोठ्यांच्या सहवासांत मी फिरतो आहे. आज मला या लाल ज्वारीची भूक नाहीं. माझं स्वप्न पुढें पुढें जात आहे. आज मला अन्न आणि वस्त्र नसलं तरी पूर्वी तें मिळत होतं कां नव्हतं याकडेच माझं मन धावत आहे.

नाशिक आणि गोवर्धन येथें अत्यंत नामांकित विणकरी रहात असत. गोवर्धन ही एक मोठी व्यापारी पेठ होती. विणकऱ्यांचीं पुष्कळ मंडळं त्यावेळीं तेथें होतीं. पांडवलेण्यांतील शिलालेखांत पुष्कळ ठिकाणीं त्यांचा उल्लेख आहे. त्यांनींही कांहीं लेणीं त्यांत तयार केलेलीं आहेत. बुद्ध भिक्षूंच्या उपजीविकेसाठीं जीं गांवं व जमीन राजांनीं दिली, तिची व्यवस्था पाहाण्याचें काम या विणकर मंडळाकडेच असें. ही झाली दोन हजारवर्षांपूर्वीची गोष्ट. आतां इ. स. १२९० ची गोष्ट सांगतो. रेशमी कापडाच्या बाबतींत नाशिक त्यावेळीं युरोपमध्यें देखील प्रसिद्धीला आलं होतं. बगदादला मार्को पोलो याला रेशमी कापडाचा जो नमुना १२९० सालीं सांपडला, तें रेशमी कापड नाशिक येथें तयार झालेलं होतं. युरोपमध्यें चौदाव्या शतकांत हेंच रेशीम, ज्याला तेव्हां नाशिक सिल्क म्हणत होतें, तेंच वापरीत होतें. इतिहासकार म्हणतो.

"It seems possible that the slyle of silk stuffs and gold brocade that Marco Polo (1290 A. D.) found, being woven at Bagadad and

called Nasich and nac originally came from Nasik. These silks were kuown in Europe in the fourteenth century as nac, nocques nachis nachiz, nacis and naisis (Yules Morco Polo)

मला कल्पना आहे कीं हें वर्णन वाचून आपला विश्वास बसणार नाहीं. सहाजिक आहे. आपल्यावरून आपण ओळखतो. पण इतिहासकार म्हणतो, त्याला आपण काय करणार ! नाशिकचे सबंध त्यावेळीं दूरदूर पसरलेले होते. सिंध मधून बुद्धभिक्षु दरवर्षी नाशिकला येत असत. नाशिक येथें बुद्धधर्माचे आमात्य रहात असत. पांडवलेण ज्या पर्वतांत कोरलेलं आहे, त्या त्रिरश्मी पर्वताची ख्याती त्यावेळीं सिंध पर्यंत गेलेली होती. सिंघमधल्या दत्तमिरी येथील राहणाऱ्या इंद्राग्निदत्त या सिंधी गृहस्थानें त्यापैकी एक लेणं कोरलेलं आहे. आणि आश्चर्य हें कीं, त्रिंबकेश्वरचा ब्रह्मगिरीचा घाटही सिंधी गृहस्थानें चाळीस वर्षांपूर्वी बांधला.

फिल्म तुटली

नाशिक, गोवर्धन यांचे खालोखाल ज्याला १२०० वर्षाचा इतिहास आहे, अशा चंद्रादित्यपुराची (चांदवड) उपलब्ध माहिती सांगतो. चंद्रादित्यपूर हें यादव घराण्याचा संस्थापक दृढप्रहार यानें इ. स. ८५० या सालीं वसवलें. दृढप्रहार हा वज्रकुमाराचा मुलगा. वज्रकुमाराची पत्नी नाशिक येथें पळून आली व नाशिक येथील आठवा जैन तीर्थंकार याच्या कुंतिविहार या नांवाच्या देवळांत तिनें दृढप्रहार याला जन्म दिला. इतिहासकार म्हणतो.

" According to an account of Nasik written in the beginning of the fourteenth century by a Jain named Jin Prabhasuri, Dridhaprahar was the posthumous son of Vajra Kumar the last King of Dwarawati ( Dwarka ) which is described as having been burnt by the sage Divarna. Vajrakumar's wife fled to Nasik and gave birth to a son in Kuntivihar the temple of the eighth Tirthankar."

दृढप्रहारानंतर सेऊनचंद्र हा गादीवर आला. त्यानें सेऊनपूर हें गांव वसवलें. हें गांव म्हणजे बहुधा हल्लीचें सिन्नर असावें. सेऊन-चंद्र याच्या पुढील सात पिढ्यांनीं चांदवड येथें राज्य केलं. अंजनिरी येथील देवळांतील शिलालेखावरून असें दिसतें कीं, इ. स. ११४१ सालीं चंद्रप्रभ या जैनांच्या देवळाला तिसऱ्या सेऊनचंद्राच्या प्रधानानें चिंचोली हें गांव देणगी म्हणून दिलें. हें चिंचोली गांव म्हणजे बहुधा नाशिक संगमनेर रस्त्यावरील देवळालीच्या पूर्वेकडे चार मैल अस-लेले चिंचोली हें गांव असावें. आज कुंतिविहार मंदार नामशेष झालें आहे. नाशिकमध्यें ते कोणत्या ठिकाणीं असावं हेंही कळूं शकत नाहीं. ज्या घराण्यांनीं चांदवडला सात पिढ्या राज्य केलं, त्यांचे अवशेष देखील आज उरलेले नाहींत.

कीर्ति कीर्ति म्हणतात ना, ते एक थोतांड आहे. एवढे मोठे राजे शातकर्णी गौतमीपुत्र, पुलुमवी, उषावदत्त यांचे अवशेष शिल्लक राहिले नाहींत; आपली काय मातबरी आहे! काचेंत

मढवलेले म्युनिसिपालटीच्या हॉलमध्यें टांगलेले फोटो किती दिवस टिकणार! फोटो काचेंत मढवण्याची जी प्रथा आहे ती मात्र यथार्थ आहे. त्यांत कीर्तीचा त्वरित नाश गृहीत धरलेला आहे! ज्यानें तीन लाख गाईंचं दान केलं, त्याचं नांव नाहीं उरलं! हे शिलालेख दोन हजार वर्ष टिकले म्हणून कांहीतरी कळलं, पण साडेतीन रुपयाचा आरसा विकत घेऊन त्यावर ठळक आपलं नांव घालून मंदिरांत देवामागें ठेवण्यांकरतां दान म्हणून देणारे मी पाहिले आहेत. साडेतीन रुपयांत अजरामर कीर्ति! अहो! मोठमोठे सम्राट गेले मग हा काचेच्या आरशावरचा व्हाइट पेंट किती दिवस टिकणार?

फार दूर कशाला. याच चांदवडची माहिती सांगतो. चांदवडला मल्हारराव होळकरांनीं इ. स. १८०० च्या पूर्वी किल्ल्यावर टाकसाळ सुरूं केली होती. साडेचारशे कारागीर रोज तेथें काम करीत होते. तीन कारागीर तासाला दोन हजार नाणीं पाडूं शकत होते. मध्यंतरी किल्ल्यावर मॅनेजर व कमांडर यांचें भांडण झाल्यावरून टाकसाळ खालीं आणली, आणि १८२१ पर्यंत सारखं काम सुरुं होतं. आणि आज! ज्या होळकरांची स्वतःची पैशाची टाकसाळ दीडशें वर्षांपूर्वी होती, ते आज वर्षासन घेण्या करतां हात पसरीत आहेत! गेलं त्यांचंही राज्य गेलं! अगदीं ताजी, ऊन ऊन हकीकत आहे ही! टाकसाळीपैकी आणखी कांहीं राहिलं असेल तर तें म्हणजे त्यावेळी जे टाकसाळ चालवीत होते त्यांचं आडनांव टाकसाळे हें राहिलं!

या मोठमोठ्या राजांना आपलं काय मागें राहावं असं वाटत होतं? शिलालेखावरून त्यांचं हृद्गत स्पष्ट दिसतं. त्यांना एकच वाटत होतं आणि तें म्हणजे आपण आयुष्यांत केलेला त्याग! आग्रारोडवरचे बंगले आणि हक्कपत्रकाची यादी त्यांनीं दिलेली नाहीं! स्वत:करतां राजवाडा बांधला असेल त्यांनीं, पण त्याचा शिलालेखांत उल्लेख नाहीं. त्यांत त्यांना भूषण वाटलं नाहीं. उलट कदाचित कमीपणा वाटत असेल. मी किती दान केलं? मी प्रजे करतां काय केलं? मी कोणतं तत्व आचरणांत आणलं. माझ्या अंगीं कोणतें सद्गुण होते, याचाच उल्लेख शिलालेखांत आहे. संस्कृति संस्कृति आणखी दुसरी कोणती असते! उषावदत्त यानें गोवर्धन येथें बांधलेल्या धर्मशाळेचे कोरीव नक्षीकाम केलेले कांहीं दगड आज गंगापूरच्या शेटजीच्या संडासाच्या पायरीला लावलेले दिसतात! त्यावेळची संस्कृति आणि आजची आमची संस्कृति दाखविण्याकरतां यापेक्षां कांहीं जास्त पुरावा पाहिजे काय? डार्विनचा सिद्धान्त फार जुना झाला. आणि तो मला आतां निराळ्या अर्थानें सत्य वाटूं लागला आहे. आजचीं माणसं हीं पूर्वीचीं माकडं होतीं! फार पूर्वीची ती गोष्ट! पण दोन हजार वर्षांपूर्वीचीं जीं माणसं होतीं तीं आज मात्र माकडं झालेलीं दिसतात! चक्रनेमिक्रमानं असाच तो सिद्धान्त असावा! माकडाचीं माणसं आणि माणसांचीं माकडं; असंच जग चालत असावं असं वाटतं! गप्पा कशाला, उदाहरणच देतो.

अखिल भारताला ललामभूत झालेला प्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ

भास्कराचार्य हा आपल्या चाळिसगांव तालुक्यांतल्या पाटण गावचा होता. इ. स. १००० ते १२०० या दरम्यान निकुंभ वंशानें पाटण (चाळीसगांव) येथें राज्य केलं. ते राजे शिवभक्त होते. त्यांच्यापैकीं सोन्हाददेव यानें इ. स. १२०६ सालीं भास्कराचार्यांच्या गणितशास्त्रावरील ग्रंथांचें अध्ययन करण्याकरतां स्वतंत्र काढलेल्या कॉलेजला पैसा व जमीन दिल्याचा शिलालेखांत उल्लेख आहे. आज त्याच पाटण गांवाला डी. एल. बी. ची नव्हे, तर व्हालेंटरी मराठी शाळा असून एक व्ह. फा. मास्तर मुलांना त्याच ठिकाणीं एक, दोन, शिकवतो! हिंदुस्थानांतले रँग्लर निर्माण करणारं पाटणचं कॉलेज आज पुन्हा पहिल्यापासून एक, दोन, शिकवायला लागलं! वाटल्यास भेट देऊन या. मात्र जातांना कॅमेरा नुसता खांद्याला अडकवूं नका! दोन्ही डोळ्यांचाही फोकस जरा बरोबर लावीत जा!

आणखीही कांहीं लहान सहान राजे नाशिक जिल्ह्यांत होऊन गेले. अभीर राजानें अंजनिरी येथें ६७ वर्षें राज्य केलं. नवव्या शतकाच्या सुरवातीला गोविंद नांवाचा राजा राज्य करीत होता. गुजराथ पासून तुंगभद्रेपर्यंतचा भाग त्याच्या ताब्यांत होता. मारकंड हें त्याचं राजधानीचं गांव होतं. इ. स. ८०८ मध्यें त्यानें कांहीं गांवांच्या देणग्या दिल्याचा उल्लेख आहे. त्यांत मारकंड पासून दहा मैलावर असलेल्या आंबे गांवाचा उल्लेख आहे. दुसरं गांव आंबे वडतूर हें आहे. बहुधा तें हल्लीचं वडनेर असावं. वरीखेड म्हणजे वरखेडच्या दक्षिणेकडील गांव व पल्लीतवर पारामोरीच्या पश्चिमेकडील अशीं तीं चार गांवं

आहेत. राजा गोविंद व बागलाणचे राठोड यांचा शरीर सबंध होता. त्याच प्रमाणें चांदवडच्या यादवाचे शरीर संबंध कोकणचे शिलाहार आणि कल्याणचे चालुक्य घराण्याशीही होते.

झालं, नाशिकच्या राजांची हकीकत संपली. ,दोनशे वर्षांपूर्वी नाशिकला बरीच देवळं बांधलीं गेलीं. तीं कोणी आणि कधीं बांधलीं त्यांची त्रोटक माहिती देतो.

(काळाराम मंदीर हें इ. स. १७८२ सालीं सरदार रंगराव ओढेकर यांनीं बांधलें. गणपति अणि मार्तंडाचें एक लाकडी देऊळ त्या ठिकाणीं पूर्वीं होतं. त्याच ठिकाणीं हें बांधलें. गणपति आणि मार्तंडाचीं देवळं जवळच पायरीजवळ बांधलीं आहेत. राममंदिराचे बांधकाम बारा वर्षे चाललें होते. दोन हजार कारागीर रोज काम करीत होते. त्यावेळीं या मंदिराला २३ लाख रुपये खर्च आला.

गंगाधर यशवंत चंद्रचूड यांनीं इ. स. १७५६ सालीं दहा लाख रुपये खर्च करून सुंदरनारायणाचें देऊळ बांधलें. नीलकंठेश्वर हें देऊळ मालेगांवचे नारोशंकर राजा बहादूर यांचे बंधू लक्ष्मण शंकर यांनीं एक लाख रुपये खर्च करून बांधलें.

सुंदरनारायणाचे देवळापासून पन्नास यार्डावर बांधलेला तास हा माधवराव पेशवे यांच्या मातुश्री गोपीकाबाई यांनी १७६१ ते ७२ या सालांत बांधला. लक्ष्मण कुंड हें सरसुभेदार महादजी गोविंद काकडे यांनीं १७५८ मध्यें बांधलें.

रामकुंड हें खटाव तालुका सातारा येथील चित्रावराव यांनीं इ. स. १६९६ सालीं बांधलें व गोपिकाबाईनीं इ. स. १७८२ सालीं दुरूस्त केलें. सिताकुंड हें गोपिकाबाईनीं बांधलें. अहिल्या-कुंड हें अहिल्याबाईनीं बांधलें.

नारोशंकराची घंटा ही वसईहून आणली. ती पोर्तुगीज आहे. घंटेवर सन १७२१ हें साल लिहिलेलें आहे. इ. स. १८७२ सालच्या पुरांत गंगेचें पाणी घंटेला लागलें होतें. हें देऊळ मालेगांवचे नारोशंकर राजेबहाद्दर यांनीं इ. स. १७४७ सालीं अठरा लाख रुपये खर्च करून बांधलें.

भद्रकालीचें देऊळ गणपतराव दीक्षित पटवर्धन यांनीं इ. स. १७९० सालीं तीस हजार रुपये खर्च करून बांधलें.

पंचरत्नेश्वर हें यज्ञेश्वर दीक्षित पटवर्धन यांनीं इ. स. १७५८ मध्यें पंधरा हजार रुपये खर्च करून बांधलें.

गंगापूर पासून तर नारोशंकराच्या देवळापर्यंत बरीच तीर्थं आहेत. या पवित्र तीर्थांची पापपुण्याच्या दृष्टीनें महती काय आहे याचा मी विचार केलेला नाहीं. या नंतरच्या दीडशें वर्षांत नांव घेण्यासारखं आम्ही कांहींच केलं नाहीं. पुढच्या इतिहासाकरतां आज आपण काय ठेऊन जात आहोंत ! कोणचं समाधान आहे आपल्याला कीं, आमची ही कला, हा सद्गुण ही संस्कृति दोन हजार वर्षांनंतर देखील आपलं नांव कायम ठेवील ! पापाची मात्र

आज आपण झाकपाक करीत आहोत. जिथं पापाची झाकपाक होते, पापाविरुद्ध ब्र काढण्याची हिंमत होत नाहीं, तिथें अधोगति अजून पूर्ण झालें नाहीं असं समजावं लागतं ! अधोगतीला अद्याप वाव आहे !

खरं नाशिकचं वैभव म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचं ! तोंच काळ खरा भाग्याचा होता. घराची वास्तुदेवता असते. तशी गांवाचीही ग्रामदेवता असावी असं वाटतं ! दोन अडीच हजार वर्षांची ती नाशिकची ग्रामदेवता एखाद्या भयाण रात्रीं जर गंगेच्या घाटावर प्रकट झाली आणि बोलली तर ती काय सांगेल ? तिच्या कोणत्या मुलांचं कौतुक करील ! हल्लीच्या कां मागच्या ! उत्कर्षाचा काळ नेहमीं नेहमीं येत नसतो. गांवाचीही कुंडली असते. नेहमींच गांवाचे ग्रह उच्चीचे नसतात. कर्तबगार पिढी नेहमीं निर्माण होत नाहीं. दोन चारशें वर्षांत एखादी पिढी कर्तबगार निपजते. सद्गुणांचा उत्कर्ष तेव्हां दृष्टीस पडतो, आणि त्या पिढींनीं मागें ठेवलेला अमोलिक ठेवा जतन करण्याची पुढच्या पिढीची पात्रता नसते. नुसते त्यांचे पोवाडे गाण्यांत दोन चार पिढ्या खलास होतात. तलावांत एखादंच कमळ कधीं निर्माण होत नाहीं. हजारो लहान मोठीं कमळं असतात, आणि त्यांतून दोन चार अतिसुंदर कमळं दिमाखानं सगळ्यांच्या वर मान करून जग पहात असतात. सर्व साधारण समाजाची संस्कृति उच्च पातळीवर गेल्याशिवाय त्यांतून मानवरत्न निर्माण होणार नाहीं.

आतां इकडे तिकडे पडलेल्या कांहीं जुन्या अवशेषांची

माहिती सांगतों. आपल्या जिल्ह्यांत एकंदर अडतीस डोंगरी किल्ले आहेत. त्यापैकीं इंद्राई, चांदवड, त्रिंगलवाडी, अंकाई टंकाई हे खरोखरी किल्ले नसून ती फार जुनी अशी देवस्थानं आहेत. नवव्या शतकापासून त्यांचा उपयोग राजकीय दृष्टीनें किल्ल्यासारखा करून घेतलेला दिसतो. इतिहासकार म्हणतो.

" Many Nasik forts Indrai, Chandor, Tringalwadi and Ankai Tankai appcar to have been used for religious purposes and like Shivaner in Junner have caves in them. The earliest mention of the fort being used for political purposes is in the ninth ceutury. In 808 Markand fort in the chandor range appears to have been an out post of Rashtra kuta King Govind II, two of whose copper plate, grants are recorded as having been issued from Markinda"

त्यानंतर बाकीचे जे घोडप, राजधर वगैरे किल्ले आहेत ते हा भाग ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यानंतर त्यांचा पुढें कोणाला उपयोग होऊं नये म्हणून मुद्दाम सुरुंग लावून उध्वस्त करून टाकलें. त्या कामावर मुद्दाम कॅ. मॅकिंटोश याची नेमणूक केलेली होती. त्यानें किल्ले उध्वस्त करण्याचें काम फारच समाधानकारक रीतीनें केल्याचा उल्लेख आहे. इतिहासकार म्हणतो.

" The Present ruinons State of these old forts is no doubt to a great extent due to the action of British Government. Up to the close of the last century it is probable that

most of them were in tact and fit for occupation and defence. On the close of the long series of wars in 1818 most of these that fell into the hands of the British were dis-mantled their-armaments were removed and the walls where necessary were blown up"

Later in the same year (1818) Captain. Macintosh was appointed to raze the fortification and in several cases did his work most effiectually.

होतं नव्हतं तेंही ब्रिटिशांनीं सुरुंग लावून उध्वस्त करून टाकलं. उध्वस्त करून टाकण्याची जशी त्यांची तयारी होती त्या बरोबरच पुराणवस्तु संशोधन या नांवाचं स्वतंत्र खातं काढून इतिहासही त्यांनी लिहून ठेवला आहे. कनिंगहॅम आणि ब्रिग्ज या युरोपियन लोकांना आपली जेवढी माहिती होती त्याच्या शतांशही आपल्याला नाहीं.

इ. स. १८१८ सालीं ब्रिटिशांशीं थोड्याशा चकमकी उडाल्या पण नांव घेण्यासारखीं झुंज कोणीच दिली नाहीं. मालेगांवच्या अरबांनीं बराच नेट धरला परंतु मालेगांव हस्तगत केल्या नंतर निवडक अरब पकडून त्यांना सुरत येथें पाठविले, आणि तेथून त्यांची थेट अरबस्तानांत रवानगी केली. भिलांनीं बंड उभारलें आणि त्रिंबक ट्रेझरी लुटली. त्यांच्या मागे त्रिंबकचे कांहीं ब्राह्मण आहेत अशी ब्रिटिशांना बातमी लागली. किल्ला हस्तगत केल्यानंतर पांडू ठाकूर यानें

कबूल केलें कीं, एका ब्राह्मणानें आम्हाला लुटावयास सांगितलें.मग सर्व ब्राह्मण रांगेंत उभे केले आणि पांडू ठाकूर यानें त्यांतून त्या ब्राह्मणाला निवडून काढले. त्या ब्राह्मणाला लागलीच तेथेंच फांशी देण्यांत आलें. अहिरगांवला त्रिंबकजी डेंगळा याला इ. स. १८१८ सालीं स्वान्स्टन यानें तो गवतांत लपलेला असतांना पकडले, आणि त्याला नंतर बंगालमध्यें पाठवण्यांत आले. अहिरगांवची एक बाई चांदवडला गेली व तिनें स्वान्स्टनला त्रिंबकजीची बातमी दिली. असं म्हणतात कीं, तिच्या नवऱ्याला त्रिंबकजीनें कांहीं दुखापत केली होती. नांदूर शिंगोट्याचा भागोजी नाईक यानें मात्र ब्रिटिशांचा नाकी दम आणला. ले. हेंद्री हा फौज घेऊन त्याला पकडण्यांकरतां गेला असताना त्यालाच त्यानें ठार केलें. समशेरपूर जवळ पुन्हां त्याला पकडण्याचा प्रयत्न केला तेव्हां ले. ग्रॅहॅम व चॅपमन या दोघांनाही त्यानें जखमी केलें. फंद फितुरी करून कोळी लोकांची पोलिसमध्यें भरती केली. कोळ्यांतला नामांकित डाकू बामला नाईक व राघोजी भांगरिया यांना ऑफिसर नेमले आणि त्यांच्याकडून भिलांचा बिमोड केला.

केवळ धावता आढावा म्हणून मी या १८१८ सालच्या हालचालीचा थोडासा तपशील सांगितला. हल्लीची आपली संस्कृति आणि १८१८ ची संस्कृति यामध्यें मला तर कांहीं फरक दिसत नाहीं. आजच्या इतकीच हीन मनोवृत्ति त्यावेळीं आपली होती. असो.

शेवटीं माझं लक्ष एकाच ठिकाणीं केंद्रित झालं आहे, आणि ते म्हणजे, गोवर्धन राजधानीवर ! या मातीच्या ढिगाऱ्यांतून दगडाचे तुकडे तुकडे जुळवून अगदीं पहिलं — जसंच्या तसं — गोवर्धन शहर मी उभं करण्याचा प्रयत्न करतो आहे. गौतमीपुत्र आणि उषावदत्त ज्या रस्त्यानें राजधानींत आले तो रस्ता जरा साफसूफ करून मी आपल्याला तिथं नेत आहे ! पूर्वीची गर्दी नाहीं दिसत आतां ! पण एकदां कां त्या वातावरणानें तुम्हांला भारलं कीं सर्व दिसूं लागेल ! दोन हजार वर्षांपूर्वीचं राजधानीचं शहर गोवर्धन ! जसंच्या तसं त्याच ठिकाणीं बांधावं असं वाटतं ! पण पुन्हा विचार येतात कीं, तिथें राहणार कोण? हल्लींचीं जिवंत माणसं ! काय लायकी आहे त्यांची ! त्यावेळच्या सगळ्या दगडांनीं आपल्याला जमीनींत पुरून घेतलं हें कशाचं द्योतक आहे ! दगडावरच्या सर्व देवांनीं आपले हात, पाय, मान, तोडून घेतली ! त्या देवादिकांनीं आत्महत्या करून घेतली ! त्यांना विनाकारण आपली ही आधुनिक संस्कृति दाखवून दुःखावर डाग कां द्यावेत ! त्यांच्या इच्छेच्या विरुद्ध जाण्यांत काय अर्थ आहे ! ते त्यांचे दिवस गेले ! गेलीं त्यावेळचीं माणसं ! सुबत्ता गेली ! ऐश्वर्य गेलं ! वैभव गेलं ! सर्वस्वाचा होम करून बांधलेल्या मंदिरांत दिवाबत्ती करतां वर्गणी करावी लागते ! तास दोन तास मिणमिण पंती जळते ! आज सरकार वाड्यासमोर उभा राहून गौतमीपुत्र एकच सवाल विचारीत आहे ! "माझ्या संस्कृतीची जोपासना तुम्ही काय केली ?" खरं आहे ! दोन हजार वर्षं आपल्या स्वाधीन केलेल्या उच्च संस्कृतींत

आपण काय भर घातली ? मानव प्राण्याचे गुणधर्म ज्यांत पराकोटीला गेले आहेत असा कोणता नाशिकांतला माणूस त्याच्या समोर उभा करणार ? नेमाडी वळू, खिलारी सांड, उत्तम उत्तम दाखविता येतील, पण मानवाचे गुणधर्म असलेला माणूस, जो जनावरापासून तात्काळ ओळखता येईल असा कोण सांपडणार ! नाशकांत आज प्रजेची समृद्धी आहे पण माणसांचा तुटवडा आहे ! मला पटतं कीं, दोन हजार वर्षांपूर्वी मेलेल्या माणसांचीं हाडं गोळा करण्यांत काय अर्थ आहे ! पण एक असं वाटतं कीं कल्पनेनं का होईना त्यावेळचा माणूस पहावा ! त्या दोन हजार वर्षांच्या हाडांचं सान्निध्य हल्लीच्या जिवंत माणसांपेक्षा जास्त माणुसकीचं वाटतं ! जिथं त्याग हा शब्द माहित नाहीं. जिथं शील, नीति, ज्ञान सत्य, सत्ता सर्व सर्व कांहीं विक्रीला काढलेलं आहे, जिथं थोडी डोळ्याची हालचाल आणि खिशांतून काढलेला रुपया वाटेल ते विकत घेऊं शकतो, तिथं गौतमीपुत्राची संस्कृति कशी राहूं शकेल !

मी हें माझं बिनवासाचं फूल घेईन, आणि अगदीं पहाटे शांत वेळीं गंगेच्या घाटावर जाईन, पवित्र अशा ठिकाणीं ठेवीन. आणि हात जोडून सांगेन कीं ज्यांनीं ज्यांनीं आमच्या नाशिककरांची मान वर रहावी अशी कामगिरी केली, ज्यांनीं आमची संस्कृति बनविली, त्यांना ही फूल ना फुलाची पाकळी अर्पण आहे. गोवर्धनच्या जुन्या गढीवर, गौतमीपुत्राच्या प्रासादाच्या किंवा

मंदिराच्या एखाद्या ढासळलेल्या दगडावर ही एक पाकळी ठेवीन. चंद्रादित्यपूरचं नुकतंच उकरून काढलेलं चंद्रेश्वर, जिथें सेऊनचंद्र खात्रीनें दर्शनाला आला असेल, तिथें थोडावेळ बसून राहीन! कल्पनेनं सेऊनचंद्र दर्शनाला येत असलेला पाहीन!

गौतमीपुत्रा, बेचिराख झालेल्या तुझ्या या गोवर्धन राजधानीच्या वेशीजवळ तुझा राजदंड हातीं घेऊन पुढें चालणारा हा भालदार चोपदार एक ललकारी मारणार! तुझी स्तुति गाणार! माझ्या मागून तूं येत आहेस कीं नाहीं हें मी पाहणार नाहीं! तूं ये किंवा येऊं नकोस! तूं आम्हाला दिलेल्या संस्कृतीची आम्ही कितीही धुळधाण केलेली असली, तरी त्या संस्कृतीचा आदर्श आमच्या डोळ्यासमोर आहे. तूं जी उच्च संस्कृति आम्हाला दाखविलीं तिचं स्मरण करून, वेशीच्या दरवाज्याआड उभा राहून तुला पुढें जाण्याची वाट करून आणि तूं राजधानींत प्रवेश करीत असतांना मान वाकवून हा चोपदार तुला नमन करील!

संपलं! वेदान्त झाला! वाचकहो, हें वाचल्या बरोबर सर्व दुनिया राईट अबाऊट टर्न करुन एकदम पूर्व संस्कृतीवर जाईल अशी अंधुक सुद्धा माझी अपेक्षा नाहीं! आपल्याला आपली मंडळी माहित असतांना भलतीच आशा मी कशी करीन! प्रथमच सांगितलं कीं हें एक ट्रेलर आहे! संत तुकाराम पाहिला तसा हा गौतमीपुत्र पहायचा आणि घरीं जायचं! पुन्हा आपला रोजचा कार्यक्रम सुरू ठेवा! असें पुष्कळ सांगणारे येतात आणि जातात! हें एक आख्यान आहे.

थोडावेळ डोळे मिटून कथेकऱ्याच्या सांगण्याप्रमाणें राम राम म्हणून टाळ्या वाजवायच्या असतात ! घरीं गेल्यावर मी जसा होतों तसाच मी राहिलो पाहिजे! वाचकहो, विनाकारण परिणाम बिरिणाम करून घेऊं नका- अं !

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0019105